# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय आयोगातील सदस्यांची नियुक्ती करण्याबाबत

**(१) ३३३७९ (१२-०१-२०२२). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय आयोगाच्या अध्यक्षांची नेमणूक करून ६ महिने झाले तरी सदस्यांची नियुक्ती अद्याप कागदावरच असल्याचे माहे सप्टेंबर २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आयोगाच्या सदस्यांना कार्यालयही नाही व बैठकीसाठी व्यवस्था नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आयोगावर अद्यापपर्यंत सदस्यांची नियुक्ती न करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, तातडीने सदस्यांची निवड करून कार्यालय उपलब्ध करून देण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१२-०७-२०२३) :** (१) शासन अधिसूचना क्र. संकिर्ण २०२०/प्र.क्र.३(अ)/मावक, दिनांक ०३ मार्च, २०२१ अन्वये महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाच्या अध्यक्ष पदावर सेवानिवृत्त न्यायमूर्ती श्री.आनंद वसंत निरगुडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) शासन अधिसूचना क्र. संकिर्ण २०२०/प्र.क्र.८४/मावक, दिनांक १५ जून, २०२१ अन्वये महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य म्हणून ९ व्यक्तींची नियुक्ती करण्यात आली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

### राज्यात उभारण्यात आलेल्या महापुरुषांच्या पुतळयांची विटंबना होत असल्याबाबत

**(२) ४७००१ (२३-०९-२०२२). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक ठिकाणी महापुरुषांचे पुतळे उभारण्यात आले असून त्याकरिता गठीत करण्यात आलेल्या देखभाल व दुरुस्ती समित्यांकडून होत नसल्याचे दिनांक ८ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती व निर्णय घेऊन या पुतळयांची विटंबना थांबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०७-२०२३) :**(१) हे खरे नाही,

आयुक्त, सर्व महानगरपालिका आणि आयुक्त तथा संचालक,नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांच्याव्दारे प्राप्त अहवालानुसार राज्यात ज्या ठिकाणी महापुरुषांचे पुतळे उभारण्यात आले आहेत त्या ठिकाणी देखभाल होत नसल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खानापूर तालुक्यातील ( जि.सांगली ) अनेक लाभार्थ्यांचे यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजनचा प्रस्ताव निधी अभावी समाज कल्याण विभागाकडे प्रलंबित असल्याबाबत**

**(३) ४७७२६ (१४-१०-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील घरकुल योजनेपासून भटक्या, विमुक्त जाती, जमातीचे लाभार्थी वंचित राहू नयेत म्हणून यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजना लागू केली असून गत दोन वर्षापासून खानापूर (जि.सांगली) तालुक्यातील अनेक लाभार्थ्यांचे प्रस्ताव जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाकडे निधीअभावी प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन खानापूर (जि.सांगली) तालुक्यातील यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजनेसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१४-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सन २०१९-२० व २०२०-२१ करीता सांगली जिल्ह्यातील खानापूर या तालुक्यातील ४४ वैयक्तिक घरकुल लाभार्थ्यांना प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. तथापि, सन २०२०-२१ मध्ये कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर सदरहू योजनेकरीता विभागास निधी उपलब्ध न झाल्याने घरकुलांना मान्यता व निधी उपलब्ध करुन देणे शक्य झाले नाही.
(२) सदरहू योजनेंतर्गत निधी अभावी घरकुल लाभार्थी वंचित राहू नयेत या उद्देशाने सन २०२३-२४ करीता सदरहू योजनेच्या अर्थसंकल्पीय तरतूदीत भरीव वाढ करुन ती रु.१८०.०० कोटी इतकी करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील श्रेणी २ च्या पशुवैद्यकीय दवाखान्याचे रुपांतर श्रेणी १ च्या पशुवैद्यकीय दवाखान्यात करण्याबाबत**

**(४) ४९७६१ (२४-०१-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात एकूण २८४१ श्रेणी २ च्या पशुवैद्यकीय दवाखान्यांपैकी ४२८ संस्थांचा दर्जावाढ करून त्यांचे रुपांतर श्रेणी १ च्या पशुवैद्यकीय दवाखान्यात करण्यासाठी नवीन पदे निर्माण करण्याकरिता शासनाने दिनांक ११ नोव्हेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास आयुक्त पशुसंवर्धन पुणे यांच्याकडून मागवलेला प्रस्ताव माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्तावाबाबत पशुसंवर्धन आयुक्तांकडून प्रस्ताव मागवून राज्यातील ४२८ श्रेणी २ पशुवैद्यकीय दवाखन्यांचे श्रेणी १ मध्ये रुपांतर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०३-०३-२०२३) :** (१), (२) व (३) राज्यातील ४२८ पशुवैद्यकीय दवाखान्यांचे श्रेणी १ मध्ये रुपांतर करण्याच्या अनुषंगाने ४२८ पदांच्या पदनिर्मितीचा प्रस्ताव वित्त विभागास सादर केला असता, वित्त विभागाने पशुसंवर्धन विभागाचा आकृतीबंध अंतिम झाल्यानंतर प्रस्ताव फेरसादर करण्याचे कळविले आहे. सद्य:स्थितीत पशुसंवर्धन विभागाचा आकृतीबंध अंतिम करण्याची कार्यवाही सुरु आहे

---

**येवला (जि.नाशिक) येथील थोर स्वातंत्र्यसेनानी श्री.तात्या टोपे यांच्या स्मारकाच्या बांधकामाला अनुदान मिळण्याबाबत**

**(५) ४९९१५ (२४-०१-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) येथील थोर स्वातंत्र्यसेनानी श्री.तात्या टोपे यांच्या स्मारकाचे बांधकाम प्रलंबित असल्यामुळे या बांधकामाचे उर्वरित अनुदान मिळण्यासाठी येवला नगरपरिषदेने दिनांक ७ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास सांस्कृतिक कार्य या विभागाकडे मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्न भाग (१) बाबत केंद्र शासनाकडे प्रलंबित असलेली रक्कम रुपये ३९४ लक्ष मिळण्यासाठी राज्य शासनाने केंद्राकडे मागणी करावी आणि राज्याचा हिश्यातील उर्वरित निधी रुपये १५७ लक्ष राज्य शासनाने येवला नगरपरिषदेला वितरीत करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ नोव्हेंबर, २०२२ व १५ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे सांस्कृतिक मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे मागणी केली आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) च्या अनुषंगाने येवला येथील थोर स्वातंत्र्यसेनानी श्री.तात्या टोपे स्मारकाच्या प्रलंबित बांधकामासाठी निधी वितरीत करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-०७-२०२३) :** (१) , (२) व (३) होय, हे खरे आहे.

येवला नगरपरिषद, जि.नाशिक यांच्या अधिपत्याखालील जागेमध्ये स्मारकाच्या बांधकामास अंदाजपत्रकानुसार एकूण रक्कमेच्या ७५ केंद्र शासन, १५ राज्य शासन व १० स्थानिक स्वराज्य संस्था या प्रमाणे राज्य शासनाचा १५ च्या मर्यादेत रु.१.५७ कोटी इतका निधी शासन निर्णय दिनांक १२.०७.२०२३ अन्वये उपलब्ध करुन दिला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यू पावलेल्यांना २० लाखांपर्यंत अर्थसहाय्य देण्याबाबत**

**(६) ५१७६३ (२३-०१-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यू झाल्यास पूर्वी १५ लाख असणारी आर्थिक मदत २० लाखांपर्यंत वाढविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अर्थसहाय्यांपैकी १० लाख रुपये तत्काळ धनादेशाने तर उर्वरित रक्कम रुपये ५ लाख पाच वर्षांकरीता व ५ लाख १० वर्षाच्या फिक्स डिपॉझिटमध्ये ठेवण्यात येणार असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या या निर्णयाचा मृतांच्या वारसांना हव्या त्या प्रमाणात उपयोग होणार नसल्याने शासनाने फेरनिर्णय घेवून सदर अर्थसहाय्याची रक्कम बाधितांना धनादेशाने अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१२-०७-२०२३) :**(१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### कोकणामध्ये वन्य प्राण्यांमुळे स्थानिक शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होत असल्याबाबत

**(७) ५२२९४ (२३-०१-२०२३). श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणामध्ये वानरे व माकडे हे भाजीपाला, नारळ, फळभाज्या, फणस, चिकू, पपई, आंबा, कुळीथ, उडीद इत्यादी पिकांचे व ग्रामीण भागातील नळे, पत्रे फोडणे इत्यादीमुळे व लोकांना होणाऱ्या शारिरीक इजा इत्यादीमुळे स्थानिक शेतकऱ्यांचे दरवर्षी लाखो रुपयांचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच याबाबत शेतकऱ्यांनी स्थानिक वन विभागाच्या अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासदंर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१२-०७-२०२३) :** (१) सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यात वानर व माकड या वन्यप्राण्यांमुळे नारळ, आंबा, सुपारी व इतर फळबागांचे नुकसान होत असल्याचे निदर्शनास येत आहे.
(२) वानर व माकड या वन्यप्राण्यांमुळे शेतपिक व फळबागांचे नुकसान होत असल्याचे तक्रारी प्राप्त होत आहेत हे खरे आहे.
(३) वानर व माकड या वन्यप्राण्यांमुळे शेतपिक व फळबागांचे नुकसान झाल्याची सन २०२०-२१ मध्ये २१०, सन २०२१-२२ मध्ये १९४ व सन २०२२-२३ मध्ये १४२ प्रकरणे निदर्शनास आली असून प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्या अनुक्रमे रु. १४,७८,१०६/-, रु. १४,०१,३८८/- व रु. ११,८५,३१८/- असे एकूण रु. ४०,६४,८१२/- इतकी नुकसान भरपाई आदा करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### भोर (जि.पुणे) येथे राजगड ज्ञानपीठ या संस्थेच्या विविध महाविद्यालयांची शिष्यवृत्तीची रक्कम मिळण्याबाबत

**(८) ५३६४६ (२९-०१-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोर (जि.पुणे) येथे राजगड ज्ञानपीठ या संस्थेच्या विविध महाविद्यालयांची मागासवर्गीय, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग शिष्यवृत्तीची रक्कम प्राप्त होण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सहकार व इतर मागास वर्ग बहुजन कल्याण विभाग मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २२ जुलै, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०५-०७-२०२३) :** (१) व (२) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही, तथापि, भोर (जि.पुणे) येथे राजगड ज्ञानपीठ या संस्थेच्या विविध महाविद्यालयांची मागासवर्गीय, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील प्रलंबित शिष्यवृत्ती अदा करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यात विमुक्त जाती व भटक्या जमाती या प्रवर्गातील कुटूंबांचे राहणीमान उंचावण्यासाठी जाहीर करण्यात आलेल्या घरकुल योजनेबाबत

**(९) ५४१६० (२४-०१-२०२३). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यात विमुक्त जाती व भटक्या जमाती या प्रवर्गातील कुटूंबांचे राहणीमान उंचावण्यासाठी जाहीर करण्यात आलेल्या घरकुल योजनेंतर्गत २ हजार ८६७ घरांचा प्रस्ताव पाठविण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रस्तावातील एकाही प्रस्तावाला मंजूरी मिळाली नसल्याने यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेचा लाभ सोलापूरकरांना मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी उपरोक्त योजनेचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१४-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये सन २०१९-२० करीता सोलापूर जिल्ह्यातील २८६७ वैयक्तिक घरकुल लाभार्थ्यांना प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. तथापि, सन २०२०-२१ मध्ये कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर सदरहू योजनेकरीता विभागास निधी उपलब्ध न झाल्याने घरकुलांना मान्यता व निधी उपलब्ध करुन देणे शक्य झाले नाही.
(२) व (३), शासन निर्णय, दिनांक २४.०३.२०२३ व दिनांक ०५.०६.२०२३ अन्वये सोलापूर जिल्ह्यातील १० घरकुल लाभार्थ्यांच्या प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देवून निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
सदर योजनेंतर्गत निधी अभावी घरकुल लाभार्थी वंचित राहू नयेत या उद्देशाने सन २०२३-२४ करीता सदरहू योजनेच्या अर्थसंकल्पीय तरतूदीत भरीव वाढ करुन ती रु.१८०.०० कोटी इतकी करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पनवेल (जि.रायगड) तालुक्यात कुळ कायद्यामध्ये नियमबाह्य फेरबदल केल्याबाबत

**(१०) ५४८९९ (२९-०१-२०२३). श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यात विक्रम माया गोंधळी रा.धनसर यांनी तहसीलदार पनवेल यांच्याकडे कुळ ठरविणे कामी माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान सर्वे नंबर १३६ (जुना४७) वर दावा दाखल केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी उक्त तहसीलदार यांनी दिनांक १८ नोव्हेंबर, २०२२ रोजी सुनावणी निश्चित करून गैर अर्जदारांना शीघ्र टपाल आणि नोटीस दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निर्गमित केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सर्वे नंबर १३६ (जुना ४७) या जमिनीवर जगदीश पाटील व इतरांच्या सामाईक मालकी ताबे कब्जातील वहिवाटीची मिळकत असलेली सदर जमीन विक्रीस काढण्यापूर्वी कोणाचा वारसा हक्क,कुळ, करार असल्याच्या मुदतीने कळविण्याबाबतची जाहीर नोटीस दिनांक १०/११/२०१८ व २५/०५/२०२२ रोजी वा त्यासुमारास वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दिनांक १० नोव्हेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास जाहीर नोटीस प्रसिद्ध करून चार वर्षाचा कालावधी उलटल्यावर कोणीही दावा दाखल न केल्याने प्रकरणाची चौकशी न करता तहसीलदार यांनी नोटीस निर्गमित केल्या प्रकरणाची चौकशी करून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०७-२०२३) :** (१) व (२) मौजे आडीवली, ता. पनवेल येथील सर्व्हे नं.१३६ (जुना नं.४७) या मिळकतीबाबत अर्जदाराने दिनांक ०६ सप्टेंबर, २०२२ रोजी अर्ज केल्याचे व या प्रकरणी दिनांक १८ नोव्हेंबर, २०२२ रोजी प्रथम सुनावणी आयोजित केली असल्याचे निष्पन्न झाले आहे.
(३) तहसिलदार कार्यालयाने वृत्तपत्रामध्ये अशी जाहीर नोटीस प्रसिध्द केलेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
तहसिलदार, पनवेल यांचे कार्यालयाकडून नोटीस प्रसिध्द करण्यात आलेली नाही. सदर प्रकरणी कोणत्याही प्रकारचे अंतरीम अथवा अंतिम आदेश पारीत झालेले नाहीत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पेण (जि. रायगड) तालुक्यातील विद्यमान तलाठी यांच्या बेकायदेशीर कामकाजाप्रकरणी जिल्हाधिकारी रायगड यांचेकडे अनेक तक्रारी प्राप्त असल्याबाबत

**(११) ५४९११ (२९-०१-२०२३). श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पेण (जि.रायगड) तालुक्यातील विद्यमान तलाठी यांच्या बेकायदेशीर कामकाजाप्रकरणी जिल्हाधिकारी रायगड यांचेकडे अनेक तक्रारी प्राप्त असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारीची दखल घेऊन निवासी उपजिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांनी उपविभागीय अधिकारी पेण यांना नियोजित कार्यवाही करण्याबाबत पत्राद्वारे निर्देश दिलेले आहेत हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त तक्रारी संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित तलाठयावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१३-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय. संबंधित तलाठी यांनी सकृतदर्शनी महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९७९ मधील नियम ३(१) (एक) (दोन) (तीन) चा भंग केला असल्यामुळे त्यांचेविरूद्ध उप विभागीय अधिकारी, पेण यांचे मार्फत विभागीय चौकशी सुरु करण्यात आली असून सदर चौकशीमध्ये संबंधित तलाठी दोषी आढळल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पाणंद रस्ते योजनेची किमान रुंदीची अट शिथिल करण्याबाबत

**(१२) ५४९९२ (२९-०१-२०२३). श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड), श्री.सुनिल शेळके (मावळ), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक शेतकरी आणि सर्व गावकरी समृद्ध व्हावे या दृष्टिकोनातून मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पाणंद

रस्ते योजना सुरु केली असून 'मी समृद्ध आहे' यांतर्गत पाणंद रस्ते करण्यासाठी किमान २० फूट जागा असणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बारमाही शेतीच्या वापराकरिता शेत पाणंद रस्ते सुयोग्य असणे गरजेचे असून त्याचाच एक भाग म्हणून प्रमाणित दर्जाचे शेत पाणंद रस्ते तयार करण्याकरीता 'मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पाणंद रस्ते योजना' राबविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच नियोजन विभाग रोजगार हमी योजना प्रभागाचा शासन निर्णय दिनांक ११ नोव्हेंबर, २०२१ रोजी मधील मुद्दा क्रमांक २२ अनुसार या रस्त्याची रुंदी किमान ३.०० मीटर असणे आवश्यक करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या रस्त्यांसाठी साईड पट्टी व पाणी वाहून जाण्यासाठी चर खुदाई करण्यासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूस मिळून साधारण तीन मीटर जागेची आवश्यकता असून ग्रामीण व डोंगराळ भागात एवढी जागा उपलब्ध होणे अडचणीचे व अशक्य असल्याने मोठ्या प्रमाणावर कामे मंजूर होऊनही पूर्ण होण्याचा वेग अत्यंत कमी आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या शासन निर्णयात दुरुस्ती करुन किमान रुंदीची अट रद्द करण्यात यावी व ग्रामपंचायत-महसूल दस्तऐवजात नोंद असणाऱ्या रुंदीनुसार काम करण्यास परवानगी दिली तर मोठ्या प्रमाणावर रस्त्यांची समस्या सुटेल व ग्रामीण भागात चांगल्याप्रकारे शेत पाणंद रस्ते या योजनेच्या माध्यमातून निर्माण होईल याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (२५-०७-२०२३) : (**१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) हे खरे नाही.
(५) शेतकऱ्यांच्या शेतमालाची वाहतूक करणे व शेतीमधील कामांकरिता आवश्यक असणाऱ्या यंत्र व अवजारांसह जाणे येणे सुगम होण्याचा उद्देशाने सदर योजना सुरु करण्यात आली आहे.

जिल्हा परिषद आणि शासन मापदंडाप्रमाणे फक्त जागेच्या उपलब्धतेप्रमाणे रुंदीमध्ये फरक पडेल तसेच खडीकरणाची रुंदी किमान ३.०० मीटर असणे आवश्यक करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील लाबाना समाजाला इतर मागास बहुजन समाजामध्ये समाविष्ट करण्याबाबत**

**(१३) ५५३०४ (२९-०१-२०२३). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात लाबाना समाज मोठ्या प्रमाणावर राहत असून त्यांची लोकसंख्या ही जास्त प्रमाणात असल्याने त्या समाजाने इतर मागास बहुजन समाजामध्ये समाविष्ट करण्याची मागणी केली असून स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व इतर मागास बहुजन मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक १८ जुलै, २०२२ व १७ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी लबाना समाजाला इतर मागास बहुजन समाजामध्ये समविष्ट करण्याबाबतची मागणी मागील अनेक वर्षापासून करीत आहेत, परंतु शासन याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात महाराष्ट्र राज्य मागास आयोगाकडून दिनांक ७ नोव्हेंबर, २०१९ रोजी अहवाल मागविण्यात आल्याचे निदर्शनास आले असून सदर अहवाल शासनाला प्राप्त झाला आहे काय, प्राप्त झाल्यास या अहवालावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१२-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) ते (५) प्रस्तूत प्रकरणी महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाकडून अद्याप अहवाल अप्राप्त आहे. तथापि, लबाना समूहाच्या मागासलेपणाचा अभ्यास करण्याकरिता सदर प्रकरण मुंबई उपसमितीकडे सोपविण्यात आले असून सदर उपसमितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर आयोगाचा अंतिम अहवाल शासनास सादर करण्यात येईल असे आयोगाने कळविले आहे.

---

**शासनाच्या महाज्योतीच्या पीएचडी व युपीएससीच्या विद्यावेतनात वाढ करण्याबाबत**

**(१४) ५५३८४ (२९-०१-२०२३). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्यावतीने "पी.एचडी." च्या उमेदवारांना नोंदणी दिनांकापासून पहिल्या दोन वर्षासाठी रुपये ३१००० घरभाडे, आकस्मिक खर्च देण्याचा संस्थेच्या संचालक मंडळाच्या बैठकीत ठराव घेण्यात आला असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच युपीएससीची पूर्वतयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे मासिक विद्यावेतन दहा हजारावरुन तेरा हजार करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या ठरावावर शासनाने निर्णय घेऊन व या योजनांच्या अंमलबजावणीसाठी निधीची तरतूद करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१९-०७-२०२३) :** (१) होय.
(२) होय.
(३) मा.मुख्यमंत्री यांनी सारथी, बार्टी, टिआरटीआय, महाज्योती या सारख्या संस्थांच्या धोरणासंदर्भात एकसमानता असण्यासाठी एक सर्वकष धोरण निश्चित करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार सामाजिक न्याय विभागाकडून कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**कृषी विभागांतर्गत शेतकऱ्यांना गट शेती प्रोत्साहन व सबलीकरण योजनेस मुदतवाढ देण्याच्या मागणीबाबत**

**(१५) ५६४९३ (१३-०६-२०२३). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कृषी विभागांतर्गत गट शेती प्रोत्साहन व सबलीकरण योजनेस दिनांक ३१ मार्च, २०२३ रोजी पर्यंत मुदतवाढ देण्याची मागणी लोकप्रतिनीधी यांनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजना कोविड-१९ सदृश परिस्थिती व विविध अन्य तांत्रिक बाबींमुळे प्रस्ताव प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शेतकऱ्यांनी दिनांक ३१ मार्च, २०२३ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत केलेल्या मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (११-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही.

(३) “गट शेतीस प्रोत्साहन व सबलीकरणासाठी शेतकऱ्यांच्या गटशेतीस चालना देणे” या योजनेंतर्गत सन २०१७-१८ व सन २०१८-१९ अंतर्गत निवड करण्यात आलेले प्रकल्प पुर्ण करण्यासाठी दिनांक १८/०५/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिनांक ०१.०४.२०२२ ते दिनांक ३१.०३.२०२४ अशी दोन वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वडगाव मावळ (जि.पुणे) येथील दुय्यम निबंधक कार्यालयातून झालेल्या दस्तांच्या चोरीबाबत

**(१६) ५६७६७ (२१-०४-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडगाव मावळ (जि.पुणे) येथे दुय्यम निबंधक कार्यालयातून अकरा दस्त चोरी गेल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने दोषी व्यक्तीवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१९-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) वडगाव मावळ, पोलीस ठाणे मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर प्रकरणात पोलीस तपास चालू आहे.
(३) गुन्हयाच्या तपासाची कार्यवाही सुरु असल्याने विलंबाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील ८ जिल्ह्यात झालेल्या बेकायदा दस्त नोंदणीबाबत

**(१७) ५६७९९ (१३-०४-२०२३). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे सह ठाणे, नाशिक, औरंगाबाद, जालना, लातूर, उस्मानाबाद आणि परभणी या सात जिल्ह्यांमध्ये तुकडेबंदी कायदा आणि स्थावर संपदा तथा मालमत्ता (विकास आणि नियमन) कायदा (रेरा) या दोन्ही कायद्याचे उल्लंघन करुन तसेच सक्षम प्राधिकरणाचे बनावट ना-हरकत प्रमाणपत्राच्या आधारे १० हजार ६३५ मालमत्तांची बेकायदा दस्त नोंदणी बाबत दोषींवर कारवाई करणार असल्याचे मा.महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास माहिती दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे जिल्ह्यात उपरोक्त कायद्यांचे आणि नियमांचे उल्लंघन करुन २७ दस्त नोंदणी कार्यालयात नोंदविण्यात आलेल्या दस्तांची तपासणी करण्यासाठी खास तपासणी पथकाचे गठण करण्यात आले आहे , हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त पथकाने बनावट दस्त नोंदणी करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांची चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत तसेच मालमत्तांची बेकायदा दस्त नोंदणी न होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१९-०७-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

तुकडे बंदी कायदा आणि स्थावर संपदा तथा मालमत्ता (विकास आणि नियमन) कायदा (रेरा) या दोन्ही कायद्याचे उल्लंघन करुन दस्त नोंदणी झाल्याचे तपासणीमध्ये निदर्शनास आले आहे.

तसेच पुणे विभागात सह दुय्यम निबंधक हवेली क्र.३ पुणे या कार्यालयामध्ये नियमितीकरण दाखला, भोगवटा प्रमाणपत्र, “क” प्रत इ. बनावट कागदपत्रे जोडून दस्तऐवज नोंदणी केल्याचा प्रकार निदर्शनास आला आहे. लातूर

विभागामध्ये बनावट बिनशेती आदेश तसेच बनावट गुंठेवारी नियमितीकरण प्रमाणपत्र तयार करुन दुय्यम निबंधकाची फसवणूक करुन दस्त नोंदणी करण्यात आल्याचे निदर्शनास आलेले आहेत.

(२) हे खरे आहे.

राज्यात तुकडेबंदी कायदा आणि स्थावर संपदा तथा मालमत्ता (विकास आणि नियमन) कायदा (रेरा) या दोन्ही कायदयाचे उल्लंघन करुन दस्त नोंदणी झाल्याचे तपासणी अंतर्गत लक्षात आल्यानंतर महसूल व वन विभाग शासन पत्र क्र.मुद्रांक-२०२०/प्र.क्र.२२२/म-१(धोरण), दिनांक २३/११/२०२० दिनांक २४/११/२०२० व दिनांक ०६/१२/२०२० अन्वये, सह दुय्यम निबंधक, हवेली क्र. १ ते २७ कार्यालयात नोंदविण्यात आलेल्या दस्तांची तपासणी करण्याकरिता राज्यातील ६ अधिकाऱ्यांच्या तपासणी पथकाचे गठन शासनामार्फत करण्यात आले होते.

(३) नोंदणी विभागातील नोंदणी कार्यालयात झालेल्या तपासणीमध्ये तुकडेबंदी व रेरा कायद्यातील तरतूदींचे उल्लंघन करुन दस्त नोंदणी झालेल्या प्रकरणात संबधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर निलंबन, बदली, विभागीय चौकशी, समज इ. कारवाई सुरु करण्यात आली आहे.

(४) हवेली क्र.३ कार्यालयात दस्त नोंदणीमधील अनियमितता निदर्शनास आल्यानंतर पुणे शहरातील सर्व दुय्यम निबंधक कार्यालयांमध्ये मागील २ वर्षातील दस्तांमध्ये जोडण्यात आलेले एन.ए.आदेश/ भोगवटा प्रमाणपत्र /रेरा प्रमाणपत्र/गुंठेवारी नियमितीकरण दाखला, 'क', प्रत किंवा इतर कोणत्याही परवानग्या, ना-हरकत प्रमाणपत्र इ.बारकाईने पडताळणी करुन व सदर कागदपत्रे बनावट असल्याची साशंकता असल्यास, संबंधित प्राधिकरणाकडून सत्यता पडताळून घेऊन ज्या दस्तांमधील कागदपत्रे बनावट असल्याचे आढळून येईल, त्या दस्तांच्या बाबतीत नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम ८२ व कलम ८३ अन्वये कारवाई करण्याबाबत योग्य ते निर्देश देण्यात आलेले आहेत.

तसेच उपरोक्त प्रकरणांमध्ये गैरव्यवहार/अनियमितता टाळण्यासाठी बनावट कागदपत्रांच्या आधारे दस्त नोंदणी करणाऱ्या व्यक्तींवर गुन्हे दाखल करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या असून पोलिस आयुक्त, पुणे यांनाही त्यांचे अधिनस्त पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यास आवश्यक सहकार्य करण्याबाबत कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## चित्रपट धोरण आणण्यात येऊन फिल्मसिटीचा पुनर्विकास करण्याबाबत

**(१८) ५६९७७ (१९-०४-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चित्रपट निर्मात्यांच्या सुविधांचा विचार करून चित्रपट धोरण आणण्यात येणार असून फिल्मसिटीचा पुनर्विकास करण्यासही शासन विचाराधीन असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठी चित्रपटसृष्टीला प्रोत्साहन मिळावे म्हणून 'अ' आणि 'ब' श्रेणीनुसार ३० आणि ४० लाखाचे अनुदानही दिले जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, फिल्मसिटीच्या पुनर्विकासासाठी शासनाकडे काही प्रस्ताव प्राप्त झाले आहेत काय, तसेच चित्रपट धोरण आणण्यात येणार आहे काय, या प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) शासनाने गठीत केलेल्या चित्रपट परिक्षण समितीमार्फत परीक्षणाअंती विहित प्रक्रिया पूर्ण झाल्यावर चित्रपटांचे "अ" आणि "ब" असे वर्गीकरण करुन, शासन निर्णय दिनांक ३० ऑक्टोबर, २०१३ नुसार "अ" दर्जा प्राप्त चित्रपट रु.४०.०० लक्ष व "ब" दर्जा प्राप्त चित्रपट रु.३०.०० इतके अर्थसहाय्य करण्यात येते. तसेच फिल्मसिटीच्या पुनर्विकासासाठी रु.१०० कोटी इतक्या रक्कमेची प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील १६ गावांमधील तलाठी कार्यालय निवासस्थाने बांधण्याबाबत**

**(१९) ५७१०९ (२१-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील १६ गावांमधील तलाठी कार्यालय निवासस्थाने बांधणे तसेच तालुका येवला ऐवजी तालुका निफाड अशी दुरुस्ती करण्याबाबत जिल्हाधिकारी नाशिक यांनी दिनांक ३० नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास महसूल उप सचिवांना पाठवलेला प्रस्ताव माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान मंजुरीसाठी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी नाशिक यांनी दिनांक ९ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास पाठवलेल्या प्रस्तावातील उक्त तालुक्यातील ३ गावांमधील मंडळ कार्यालये निवासस्थाने इमारत बांधकामांना शासनाने मंजुरी देण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१८-०७-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) निफाड तालुक्यातील येवला मतदार संघातील एकूण ३ गावांमध्ये मंडळ कार्यालय व निवासस्थान बांधणेकरीता रु.४५.०० लक्ष इतक्या अंदाजपत्रकास शासन निर्णय, दिनांक २७/०६/२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

तसेच ता.येवला, जि.नाशिक येथे १६ तलाठी कार्यालये तथा निवासस्थान बांधकाम च्याऐवजी ता. निफाड, जि. नाशिक येथे १६ तलाठी कार्यालये तथा निवासस्थान बांधकाम, असे महसूल व वन विभाग, शासन शुध्दीपत्रक, दिनांक १२/०७/२०२३ रोजी निर्गमित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्ह्यातील खामगांव येथे नवीन राज्य उत्पादन शुल्क कार्यालये बांधण्याबाबत**

**(२०) ५७१९८ (१९-०४-२०२३). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव येथे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या निरीक्षकांना व कर्मचाऱ्यांना कार्यालयीन कामकाजाकरीता असलेले कार्यालय मोडकळीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील इमारत मोडकळीस आल्यामुळे अपघात होऊन कर्मचाऱ्यांना दुखापत होण्याची शक्यता निर्माण झाली आहे ,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विभागाच्या निरीक्षक व कर्मचारी यांना कार्यालयीन कामकाजासाठी नवीन कार्यालय बांधण्यास मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई (१८-०७-२०२३) :** (१) व (२) खामगाव येथील निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, खामगांव, दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, खामगांव व दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, शेगांव हे तिन्ही कार्यालये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागेत एकाच इमारतीत कार्यरत आहेत.

अधिक्षक,राज्य उत्पादन शुल्क,बुलढाणा यांनी सदर इमारतीचे संरचनात्मक परिक्षण करण्याबाबत दि.१०.०५.२०२३ च्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, खामगांव यांना विनंती करण्यात आली आहे. याबाबतचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही.

(३) राज्य उत्पादन शुल्क विभागाची जागा पोलीस विभागाच्या ताब्यात असल्याने ती राज्य उत्पादन शुल्क विभागास उपलब्ध करुन देण्याकरिता जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचेस्तरावरून अर्धशासकीय पत्र दिनांक ३१.१२.२०२१ व स्मरणपत्र दिनांक १५.०३.२०२२ अन्वये जिल्हा पो. अधीक्षक, बुलढाणा यांना विनंती केली आहे. जिल्हा पोलीस अधिक्षक,बुलढाणा यांनी त्यांचे अर्धशासकीय पत्र दिनांक २३.०३.२०२२ नुसार त्यांचे मालकीच्या जागेवरील बांधकामाचा प्रस्तावास मान्यता मिळालेली असून बांधकाम पूर्ण होताच सदरची जागा परत करण्याची तजवीज केल्याबाबत अवगत केले आहे.

सदरची जागा पोलीस विभागाकडून राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या ताब्यात आल्यानंतर पुढील कार्यवाही करता येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोरडेवाडी, (ता. केज, जि. बीड) येथे नवीन पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी क्र.२ ला मंजुरी देऊन कार्यान्वित करण्याबाबत**

**(२१) ५७३१५ (२१-०४-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरडेवाडी, (ता. केज, जि. बीड) येथे नवीन पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी क्र.२ स्थापन करण्यासाठीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिरिक्त आयुक्त, पशुसंवर्धन, म.रा.पुणे. यांनी मौजे कोरडेवाडी या भागातील पशु घटक संख्या जास्त असून सदर परिसरातील लोकांची पशुधन आरोग्य सेवा/कृत्रीम रेतन केंद्र. इत्यादी संस्था नसल्याचा अहवाल दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पशुवैद्यकीय दवाखाना नसल्याने सदर परिसरातील शेतकऱ्याच्या पशुधनाला आरोग्य सेवा मिळण्यास अडचणी येत असल्यामुळे नवीन पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी क्र.२ ला मंजुरी देऊन कार्यान्वित करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पशुसंवर्धन मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे दिनांक १२ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार येथे पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी क्र.२ च्या प्रस्तावास मंजुरी दिली आहे काय, त्यासाठी किती रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे व याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१८-०७-२०२३) :** (१), (२) व (३) होय. हे खरे आहे.

(४) व (५) वित्त विभाग, शासन निर्णय दि.२५.५.२०१७ अन्वये विभागाचा सुधारित आकृतीबंध मंजूर झाल्याखेरीज नवीन पदनिर्मितीस अनुमती नसल्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. त्यामुळे सदर प्रस्तावावर पुढील कार्यवाही करण्यात आली नाही.

---

**अंबाजोगाई (जि.बीड) येथील सर्व्हे.नं. ३५८ या इनाम जमिनीची नोंद भोगवटा-२ मध्ये करण्याबाबत**

**(२२) ५७३६८ (२१-०४-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील सर्व्हे.नं.३५८ जमिनीच्या हस्तलिखित ७/१२ वर ईनाम लिहिलेले आहे. तसेच धर्मदाय आयुक्त, लातूर यांनी लिलाव केल्याची नोंद आहे. सदर आदेशामध्ये अंबाजोगाई (जोगाईवाडी) येथील सर्व्हे.नं. ४३१ चा धर्मदाय आयुक्त, लातूर. यांनी लिलाव केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंबाजोगाई येथील सर्व्हे.नं.३५८ व सर्व्हे.नं.४३१ या दोन्ही जमिनी देवस्थानच्या असल्यामुळे धर्मदाय आयुक्त, लातूर यांनी लिलाव केला होता. सर्व्हे.नं. ४३१ ही जमीन गाव नमुना नंबर ३ मध्ये नोंद असल्यामुळे तहसीलदार यांनी भोगवटा-२ केली आहे. परंतु शासनाने वारंवार देवस्थान/इनाम जमीन गाव नमुना नंबर ३ ला नोंद घेण्याबाबत आदेश, पत्रे, स्मरणपत्रे, देऊनही येथील बऱ्याच सर्व्हे नंबरचा गाव नमुना नं.३ मध्ये नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. त्यातच सर्व्हे.नं. ३५८ चा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सर्व्हे.नं.३५८ च्या हस्तलिखित व इतर कागदपत्रात इनाम स्पष्ट लिहिलेले आहे. तहसीलदार, अंबाजोगाई. यांनी सर्व्हे.नं.३५८ व सर्व्हे.नं.४३१ हया जमिनी इनाम असल्याचा अहवाल जिल्हाधिकारी यांना दिला आहे. तसेच अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई. यांनी चौकशी करून अहवाल कार्यवाहीसाठी जिल्हाधिकारी, बीड. यांच्याकडे सादर केला असून त्यांनी सदर अहवालात सर्व्हे.नं.३५८ ही जमीन इनाम असून सदर जमिनीचे निश्चिती प्रमाणपत्र घेतले नसून शासनास नजराणा भरला नसल्याचा अभिप्राय नोंदवत गंभीर आक्षेप नोंदवले आहेत. वरील प्रकरणी कार्यवाही करणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे महसूल मंत्री यांचेकडे दिनांक १० डिसेंबर, २०२२ व दिनांक १८ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने वरील इनाम जमीन भोगवटा-२ ची भोगवटा-१ करणाऱ्या सर्व संबंधितावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) धर्मादाय आयुक्त, औरंगाबाद यांच्या दिनांक १९.०४.२००२ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने सर्व्हे नं. ४३१ ही जमीन वर्ग-२ करण्यात आली आहे. तसेच, तलाठी सज्जा अंबाजोगाई यांनी स.नं.३५८ ही जमीन चूकीच्या पध्दतीने वर्ग १ केली असल्याने सदर स.नं.३५८ या इनाम जमिनीची नोंद गा.न.नं.३ मध्ये घेवून सदर स.नं.३५८ हा वर्ग-२ करणेबाबत आदेशित केले होते. त्यानुषंगाने, तहसीलदार, अंबाजोगाई यांनी दिनांक ०३.०९.२०२१ व दिनांक १२.१२.२०२२ रोजीच्या पत्रांन्वये संगणीकृत गा.न.नं.१ क ची नोंदवही अद्ययावत करण्याबाबत सूचना सर्व तलाठी व मंडळ अधिकारी यांना दिल्या आहेत. सदर क्षेत्राचा धारणाधिकार बदलल्या प्रकरणी मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे रिट याचिका क्र.२५७८/२०२३ दाखल केली असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(३), (४) व (५) हे खरे आहे अपर जिल्हाधिकारी, बीड यांनी दिनांक ०७.१२.२०२२ रोजी अहवाल सादर केला असून सदर अहवालाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही जिल्हाधिकारी, बीड यांचेस्तरावरुन सुरु आहे.
उक्त प्रकरणी उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई यांनी संबंधित मंडळ अधिकारी व तलाठी यांना दिनांक ०६.०७.२०२० रोजीच्या आदेशाव्दारे निलंबीत केले आहे.

---

**नागपूर येथील ८५८ जिल्हा परिषद शाळांचा फेरफार प्रलंबित असल्याबाबत**

**(२३) ५७३७६ (२१-०४-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील जिल्हा परिषदेच्या ८५८ शाळा ज्यांचे ७/१२ शासनाच्या नावावर असून त्याचा फेरफार शाळेच्या नावावर करण्यासाठी येथील शिक्षणाधिकारी कार्यालयाकडून माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान तहसिल कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त एकाही प्रस्तावावर अद्याप कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्तावासंदर्भात शासनाने माहिती घेवून या प्रस्तावाना मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१८-०७-२०२३) :** (१), (२), (३), व (४)

जिल्हा परिषदेच्या शाळा ज्यांचे ७/१२ शासनाच्या नावावर आहे. त्याचा फेरफारासंबंधी कार्यवाही करण्याचे प्रस्ताव संबंधित तहसिलदार यांचेकडे माहे मार्च, २०२२ मध्ये पाठविण्यात आलेले आहेत. उक्त प्रस्तावासंदर्भात तालुकास्तरावर कार्यवाही सुरु आहे.

---

## केज (जि. बीड) येथे ८ मेगावॅट सौरउर्जा प्रकल्पासाठी जमीन उपलब्ध करून देण्याबाबत

**(२४) ५७४३२ (११-०५-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज (जि. बीड) येथील नगर पंचायतीचे आर्थिक उत्पन्न कमी असल्यामुळे शासनाच्या धोरणानुसार नगरपंचायतीच्या उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीकोनातुन व नगरपंचायतीच्या स्ट्रीट लाईट व पाणीपुरवठा विभागाच्या बिलाचे बचत करण्यासाठी केज शहरातील शासनाच्या मालकीची गायरान जमीन सर्वे नं. १०० मध्ये ४५ एकर जमिनीवर ८ मेगावॅटचा सौरउर्जा प्रकल्प राबविण्यासाठीचा ठराव नगर पंचायतीने जिल्हाधिकारी यांना सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शहरात शासनाच्या मालकीची जमीन उपलब्ध आहे, त्या धोरणानुसार नगरपंचायती मध्ये उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीकोनातुन व नगरपंचायतीच्या स्ट्रीट लाईट व पाणीपुरवठा विभागाचे बिलाचे बचत करण्यासाठी सर्वे नं.१०० मध्ये ४५ एकर जमिनीवर ८ मेगावॅटचा सौरउर्जा प्रकल्पसाठी जमीन उपलब्ध करून देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य व जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे दिनांक १० डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१८-०७-२०२३) :**

(१) नगर पंचायत, केज यांनी दिनांक १९.५.२०२२ रोजी सौरउर्जा प्रकल्प राबविण्यासाठीचा ठराव क्र.४५ पारित केला आहे. तथापि, सदर ठराव जिल्हाधिकारी, बीड यांना सादर करण्यात आलेला नाही.

(२) व (३) होय. यासंदर्भात प्रथमत: नगर विकास विभागाकडून कार्यवाही होणे आवश्यक असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे निवेदन उचित कार्यवाहीस्तव नगर विकास विभागाकडे पाठविण्यात आले आहे. सदर विभागाकडून जमीन मागणीचा परिपूर्ण प्रस्ताव अद्याप प्राप्त झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात 'मागेल त्याला शेततळे' योजनेबाबत

**(२५) ५७८२४ (२१-०४-२०२३). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेतीला सिंचन व्यवस्था 'मागेल त्याला शेततळे' देण्याची योजना सुरु करण्यात आली असता सन २०१९ या कालावधीपासून बंद झाली असून त्याऐवजी मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सोलापूर जिल्हा हा रब्बीचा जिल्हा असून बहुतांश टक्के शेती ही पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेतून ६९० शेततळ्यांचे उद्दिष्टे दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे महाडीबीटी पोर्टलवर वैयक्तिक शेततळ्यांसाठी १७ हजाराहून अधिक अर्ज आले असून त्यामधून केवळ १७२९ अर्ज वैध झाले असून ३१० शेततळ्यांना मंजूरी देण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये व त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी वैयक्तिक शेततळ्यासाठी अर्जांची संख्या जास्त व उद्दिष्ट्य अत्यंत कमी असल्याने ही तफावत दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (१२-०७-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेंतर्गत सोलापूर जिल्ह्यातून दिनांक २३.०२.२०२३ अखेर महाडीबीटी पोर्टलवर १६१४ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ६७९ अर्जांची ऑनलाईन लॉटरीद्वारे निवड झाली आहे. त्यापैकी शेतकऱ्यांनी अपलोड केलेल्या ६२ अर्जांना पूर्वसंमती दिली होती. महाडिबीटी पोर्टलवर दिनांक ०१.०७.२०२३ अखेर ११६४ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ७४७१ अर्जांची ऑनलाईन लॉटरीद्वारे निवड झाली आहे. त्यापैकी शेतकऱ्यांनी अपलोड केलेल्या ८४१ अर्जांना पूर्वसंमती दिली आहे.
(४) सदर प्रकरणी कृषि विभागाच्या शासन परिपत्रक क्र. मुशासिं ०३२३/प्र.क्र.४७/१४अे दिनांक २५.०४.२०२३ अन्वये सन २०२३-२४ या वर्षाकरीता मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेंतर्गत प्रत्येक अर्जदारास “मागेल त्याला शेततळे” हा घटक उपलब्ध करुन देण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पाथरी (जि.परभणी) येथे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत पाणंद रस्त्यांसह गावांतर्गत रस्त्यांची कामे रखडल्याबाबत

**(२६) ५७८७६ (२१-०४-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाथरी (जि.परभणी) येथे शासनाने सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत ४५ गावातील ९६ पाणंद रस्त्यांच्या कामांना मंजूर देऊन त्यापैकी ३८ रस्त्यांच्या कामांना सुरुवात करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील ३ महिन्यांपासून मंजूर झालेल्या एकाही कामाचे हजेरीपत्रक काढण्यात आले नसल्यामुळे पाणंद रस्त्यांसह गावांतर्गत रस्त्यांची कामे रखडलेली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात पाणंद रस्त्यांसह गावांतर्गत रस्त्यांची कामे रखडल्याबाबत तसेच हजेरीपत्रक काढण्यास विलंब लागण्यास जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (२५-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे, खरे नाही.
(३) पाणंद रस्त्यांची एकुण ९६ कामांना प्रशासकीय मान्यतेसह कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. तसेच, त्यातील ३८ कामांवर एकुण रु.२३.७९ लाख खर्च झालेला आहे. मनरेगांतर्गत नोंदणीकृत मजुरांकडुन कामाची मागणी नुसार आणि कामावर हजर राहीलेल्या मजुरांच्या संख्येनुसार कामे पुर्ण करण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सावरखेड (पिं) (ता.मोर्शी, जि.अमरावती) येथे वनपर्यटन केंद्राची निर्मिती करण्याबाबत**

**(२७) ५७८९० (२१-०४-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावरखेड (पिं) (ता.मोर्शी, जि.अमरावती) येथे पिंगळा देवीच्या पायथ्याशी ई-क्लास जागेवर मोठ्या प्रमाणात झाडे असून वन विभागामार्फत वन पर्यटन केंद्राची निर्मिती करण्यात यावी, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २० सप्टेबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास उपवनसंरक्षक, अमरावती यांना निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी पर्यटन केंद्राचे निर्मिती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (११-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) सावरखेड (पी.) तालुका मोर्शी जिल्हा अमरावती येथे पिंगळादेवीच्या पायथ्याशी ई-क्लास जमिन असुन त्याचं गांव नमुना सातबाऱ्यावर भूमापन क्र.११५ (२५हे.) भुमापण क्र.११६ (१० हे.) भूमापन क्र.११६ (१८ हे.) अशी नोंद आहे व गांव नमुना सात-बारा (अधिकार अभिलेख पत्र) मध्ये ही संपुर्ण जमिन पोटखराब (लागवडी योग्य नसलेली) अशी नोंद आहे.

सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो व अतिक्रमण निर्मुलण) अधिकारी, अमरावती वनविभाग यांनी सदर जागेची पाहणी केलेली असुन त्यांनी कळविलेले आहे की, सद्य परिस्थितीत तेथे अल्प प्रमाणात नैसर्गिक झाडे अल्प प्रमाणात सपाट भुभागावर सावली देणाऱ्या झाडांची लागवड केलेली आहे. उर्वरीत संपूर्ण ई-क्लास जागा ही तिव्र उताराची असून, सदर भूभागाची मोठ्या प्रमाणावर धूप झालेली आहे व सदर ठिकाणी जमिनीचा पृष्ठभाग बाहेर येवुन संपुर्ण जमिनीवर Rock Belt उभे दिसत आहेत. तिव्र उतारामुळे पाणी एका ठिकाणावरुन वाहत जावुन छोट्या छोट्या नाल्या तयार झालेल्या आहेत. सदर ठिकाणी तिव्र उतार, पावसाच्या पाण्याने झालेली धुप, जमिनीचा उघडा पडलेला पृष्ठ भाग व लागवडीकरीता आवश्यक असलेली मातीची खोली नसल्यामुळे सदर क्षेत्र वनपर्यटन केंद्राची निर्मिती करिता योग्य नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उस्मानाबाद शहरातील वर्ग दोनच्या जमिनीचा तिढा सुटत नसल्याने शहरातील कोटयवधी रुपयांचे व्यवहार ठप्प झाल्याबाबत**

**(२८) ५८५३८ (२१-०४-२०२३). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद शहरातील वर्ग दोनच्या जमिनीचा वाद सुटत नसल्याने शहरातील कोटयवधी रुपयांचे व्यवहार होत नसल्याने अनेक बांधकाम व्यवसायिकांना मोठया आर्थिक संकटाना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०७-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

उस्मानाबाद शहरातील भोगवटदार वर्ग-२ च्या अनुषंगाने ज्या जमिनी मुलत: प्रतिबंधीत सत्ता प्रकारातील होत्या मात्र विहीत कार्यपध्दतीचा अवलंब न करता यापैकी काही जमिनी भोगवटदार वर्ग-१ लावण्यात आल्या होत्या. अशा जमिनी ई-चावडी आज्ञावलीची अंमलबजावणी बाबत शासन निर्णय दिनांक ०४.०१.२०१३ नुसार पुर्ववत प्रतिबंधीत सत्ता प्रकारात नोंद घेण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

नियमानुसार ज्या जमिनी वर्ग-२ असणे आवश्यक होत्या अशा जमिनी त्यांचे जुने अभिलेखे तपासून वर्ग-२ करण्यात आल्या आहेत.

कुळ खाते धारकांच्या तसेच मदतमास इनाम जमिनी त्या त्या कायदयानुसार नजराना रक्कम भरणा करुन घेऊन वर्ग-१ करण्यात आलेल्या आहेत.

ई-फेरफार प्रणाली मधील संगणकीकृत ७/१२ ची अचुकता निश्चित करण्यासाठी महसूल विभागाच्या वतीने चावडी वाचनासह एडीट- मोडुल, री-एडीट मोडुलव्दारे ७/१२ मधील दुरुस्तीची कार्यवाही करण्यात आलेली आहे. सदर कार्यवाहीमध्ये नागरिकांच्या निवेदनाच्या अनुषंगाने मंडळ निहाय अभियान स्वरुपात सर्व हितसंबंधीत यांना नोटीस बजावणी करुन संबंधीत खातेदार यांना त्यांचे म्हणणे व पुरावे सादर करणेबाबत सुनावणची संधी देण्यात आली आहे.

सबब, उस्मानाबाद शहरातील जमिनीचे व्यवहार ठप्प झाले हे म्हणणे संयुक्तीक वाटत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अमरावती येथे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत राज्य अभिसरण आराखड्याला कामाचे प्रस्ताव परत करण्याबाबत

**(२९) ५९३५३ (२१-०४-२०२३). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत राज्य अभिसरण आराखड्याला कामाचे प्रस्ताव परत करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांना अमरावतीचे जिल्हाधिकारी कार्यालयाचे कार्यक्रम अधिकारी महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना तथा तहसीलदार यांनी दिनांक १० जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास पत्र क्रमांक १२/२३ व ११/२३ देऊन कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेंतर्गत अनेक कामे प्रस्तावित करुन लोकप्रतिनिधी यांनी वारंवार जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठपुरावा केला असून या अडचणीसंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकाऱ्याकडून लोकप्रतिनिधी यांना सांगितले गेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रस्ताव परत केल्याने ज्या घटकाशी संबंधित आहे तसेच ती कामे ज्यांची आहे त्या लोकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त कामे मंजुर करण्याबाबत अधिकाऱ्यांना आदेश देण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (२४-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये जिल्ह्याच्या अकुशल व कुशल ६०:४० प्रमाणाचा विचार करता तसेच नियोजन करणेकरीता कुशल निधी शिल्लक नसल्यामुळे स्थानिक विकास निधी व मनरेगा अभिसरणाचे प्राप्त प्रस्ताव जिल्हास्तरीय अभिसरण समितीने रद्द करण्याचा निर्णय घेतलेला आहे.त्यामुळे सदरचे सर्व प्रस्ताव परत करण्यात आले आहेत.मनरेगा योजनेंतर्गत जिल्हास्तरीय अभिसरण समिती निर्णय घेते. याबाबत शासन निर्णय दिनांक ३० मार्च,२०२१ अन्वये मनरेगा योजनेशी अभिसरणाच्या कार्यवाहीबाबत धोरण ठरविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मालवण (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यातील भूमी अभिलेख कार्यालयात शासन मान्यतेपेक्षा ५० टक्के कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत

**(३०) ५९३६१ (२१-०४-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यातील भूमी अभिलेख कार्यालयात शासन मान्यतेपेक्षा ५० टक्के कर्मचारी पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिक्त पदांमुळे उक्त तालुक्यातील सर्वसामान्य नागरीकांची कामे अनेक महिन्यांपासून कार्यवाहीसाठी प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कार्यालयात मोठ्या प्रमाणात पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत व उक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.

उप अधीक्षक भूमि अभिलेख मालवण तालुक्याची सद्यस्थितीत मंजूर, कार्यरत, रिक्त पदांची माहिती खालील प्रमाणे -

| अ.क्र. | संवर्ग | मंजूर पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | गट ब | १ | १ | ० |
| २ | गट क प.स. २ | २ | २ | ० |
| ३ | गट क प.स. ३ | ३ | ३ | ० |
| ४ | गट क प.स. ४ | १० | ३ | ७ |
| ५ | गट ड दप्तरबंद | १ | ० | १ |
| ६ | गट ड शिपाई | ५ | २ | ३ |
| | **एकूण** | **२२** | **११** | **११** |

(२) हे खरे आहे.

मालवण तालुक्यातील उप अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालयातील एकूण ११ पदे रिक्त असल्यामुळे नागरिकांना नकला देणे, मोजणी प्रकरणी मोजणी करणे यासारखी कामे प्रलंबित असून उपलब्ध कर्मचाऱ्यांकडून नागरिकांची कामे करण्यात येत आहेत.

(३) शासनाकडून पदभरतीवर निर्बंध असल्यामुळे सन २०१४ नंतर भूमि अभिलेख विभागात पदभरती झालेली नव्हती. तथापि, आता शासनाने पदभरतीवरील निर्बंध शिथील केले असल्यामुळे भूमि अभिलेख विभागांतर्गत कोकण प्रदेश, मुंबई करिता गट-क पदसमुह ४ (भूकरमापक तथा लिपीक-टंकलेखक) संवर्गातील सरळसेवेने पदभरती प्रकिया सुरू असून त्यानुसार दिनांक २८.०४.२०२३ रोजी एकूण २३० पदांकरीता निवडसूची प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. त्यामधून रत्नागिरी जिल्ह्यातील कामाची आवक व प्रशासकीय निकड विचारात घेवून गट-क पदसमूह-४ संवर्गातील रिक्त पदांवर नियुक्ती देण्यात येणार आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कर्नाळा येथील अभयारण्याच्या विकास आराखड्याबाबत**

**(३१) ५९३७४ (२१-०४-२०२३). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्नाळा (ता.पनवेल, जि.रायगड) येथील अभयारण्याचा वन विभागाने निसर्ग पर्यटनाचा परिपूर्ण विकास आराखडा सादर करण्याच्या सूचना मा.वन मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १९ व २० जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास सह्याद्री अतिथीगृहामध्ये सर्व संबंधितांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सूचनेनुसार विकास आराखडा सादर करण्यात आला आहे काय, तसेच सदर आराखड्यात दर्शविण्यात आलेली प्रमुख वैशिष्ट्य कोणती आहेत,

(३) असल्यास, सदर बैठकीत घेतलेल्या निर्णयांचे थोडक्यात स्वरुप काय आहे, तसेच कर्नाळा निसर्ग पर्यटनाकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०७-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.

कर्नाळा पक्षी अभयारण्य (ता.पनवेल, जि.रायगड) येथील अभयारण्याचा वन्यजीव विभागाने निसर्ग पर्यटनाचा परिपूर्ण विकास आराखडा सादर करण्याच्या सूचना मा.मंत्री (वने) यांनी दिनांक १९.०१.२०२३ रोजी सह्याद्री अतिथीगृहामध्ये झालेल्या बैठकीत सर्व संबंधितांच्या उपस्थितीत दिला होता.

(२) होय, कर्नाळा पक्षी अभयारण्याचा पर्यटन विकास आराखडा उपवनसंरक्षक (वन्यजीव) ठाणे यांनी दिनांक १३.०६.२०२२ रोजीच्या पत्रान्वये सादर केला होता. परंतु मा.मंत्री (वने) यांनी दिनांक १९.०१.२०२३ रोजी सह्याद्री अतिथीगृहामध्ये दिलेल्या सुचना तथा आदेशान्वये सदरचा सुधारीत प्रस्ताव व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांचे कार्यालयाकडे सादर करण्यात आलेला असून सदर प्रस्तावाला महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२३ रोजी संपन्न झालेल्या कार्यकारी समितीच्या सभेच्या कार्यवृत्तांतामध्ये मुद्दा क्र.२.९ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

सदर आराखडयात दर्शविण्यात आलेली प्रमुख अभयारण्यातील पुर्व व पश्चिम दोन्ही Campsite चा विकास निसर्ग परिचय केंद्र,

निसर्ग पायवाटा सुधारणा

Adventure Park

Viewing Gallery for waterfall

Tree House

A V Room

तारागांव-कोरलवाडी, आपटागांव-कोळीवाडा, पोसरी, आकुळवाडी या चार ग्रामपरिस्थितीकीय विकास समित्यांच्या सहभागातुन अंतर्गत समाविष्ठ असलेल्या कामांपैकी अनुषंगीक कामांचा सुध्दा आराखडयात समावेश आहे.

(३) सदर आराखडयातील कामांबाबत अनुदानाची मागणी प्राप्त झालेनंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुख्यमंत्री कृषी व अन्य प्रक्रिया योजनेंतर्गत लाभर्थ्यांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३२) ५९६८६ (२१-०४-२०२३). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुख्यमंत्री कृषी व अन्य प्रक्रिया योजनेंतर्गत शासन निर्णयाप्रमाणे सन २०१७-२०१८ ते २०२२-२०२३ या कालावधीत विविध स्तरावर प्रलंबित सर्वच अर्जदार लाभार्थ्यांच्या प्रस्तावांना मान्यता देवून निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे दिनांक १० नोव्हेंबर, २०२२ रोजी व त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कृषि आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली प्रकल्प मंजूरी समिती स्तरावर बहुतांश प्रस्ताव प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेमधील नियम व अटीतील बदलामुळे कृषि क्षेत्रामध्ये नवउद्योजक म्हणून उदयास येणाऱ्या सुशिक्षीत तरुणांमध्ये असंतोष पसरला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रलंबित प्रस्ताव सन २०२२-२३ या कालावधीत पूर्णत्वास घेवून जाण्यासाठी कृषि विभागाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०३-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) प्रलंबित असलेल्या प्रस्तावांची मोक्का तपासणी करुन अनुदानास प्राप्त असणारे प्रस्ताव मंजूरीसाठी राज्य स्तरीय प्रकल्प मंजूरी समितीपुढे ठेवण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माजलगाव (जि. बीड) योजनेतील कामासाठी शासकीय जागा उपलब्ध करून देण्याबाबत**

**(३३) ६००२७ (२१-०४-२०२३). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माजलगाव (जि. बीड) यांना सौरऊर्जा प्रकल्प योजनेतील कामासाठी शासकीय जागा उपलब्ध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी उपविभागीय अधिकारी यांना दिनांक १९ डिसेबंर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपविभागीय अधिकारी,यांनी दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये तहसीलदार, माजलगाव/वडवणी/ धारूर यांना शासकीय जागा उपलब्धते बाबत अहवाल सादर करण्याबाबत कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित तहसीलदार यांनी जागा उपलब्धतेबाबतचा अहवाल सादर केला आहे काय ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०७-२०२३) :** (१) होय.
(२) होय.
(३) होय. बीड जिल्ह्यातील माजलगाव, वडवणी व धारूर तालुक्यातील मागणी केलेल्या विविध ठिकाणांपैकी ९ ठिकाणी मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्पासाठी शासकीय जमीन उपलब्ध करुन देण्याबाबत आदेश जिल्हाधिकारी, बीड कार्यालयाने निर्गमित केले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोरेगांव (पूर्व) येथील दादासाहेब फाळके चित्रनगरीतील महामंडळाच्या ॲडलॅब कंपनीला दिलेल्या जागेबाबत**

**(३४) ६०१३५ (२०-०४-२०२३). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील गोरेगांव (पूर्व), दादासाहेब फाळके चित्रनगरीतील चित्रपट महामंडळाच्या मालकीची सन १९९६ या कालावधीत ३० कोटी रुपये किमंतीची ७ एकर जागा भाडेपट्ट्याने ॲडलॅब प्रोसेसिंग कंपनीला दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामंडळाची परवानगी न घेता व जागेची मालकी स्वत:कडे नसतानाही महामंडळाच्या जागेच्या नावे काढलेले शेअर्स रिलायन्स कंपनीला विक्री केल्यासंदर्भात रिलायन्स कंपनीने सदरहू ७ एकर जागा परस्पर ताब्यात घेऊन त्याचा बेकायदेशीररित्या वापर केला असल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-०७-२०२३) :** (१) , (२) व (३) हे खरे नाही.

संचालक मंडळाच्या क्र.५४/०६, दिनांक २३.०२.१९९३ च्या ठरावाअन्वये चित्रनगरी फिल्म लॅबोरेटरी स्थापन करण्यास संचालक मंडळाने मान्यता दिली आहे. मे.ॲडलॅब फिल्म प्रा.लि. यांना फिल्म प्रोसेसिंग लॅबोरेटरी उभारण्याकरीता ८७०७.५० चौ.मी. इतकी महामंडळाची जमीन ३३ वर्षाच्या मुदतीकरीता दिनांक ११.११.१९९३ रोजी भाडेपट्टयाने दिलेली आहे. याबाबतचा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित, दादासाहेब फाळके चित्रनगरी व व्यवस्थापकीय संचालक, ॲडलॅब कंपनी लिमिटेड यांच्यात सामंजस्य करार (Memorandum of Understanding) झालेला आहे. सदर जागेवरील बांधकामाचा खर्च ॲडलॅब कंपनी लिमिटेड यांनी केला असून, याबाबतचे करारपत्र व करारनामा (Memorandum of Agreement & Deed of Lease) अनुक्रमे दिनांक ०३.०२.१९९४ व दिनांक २१.१०.१९९६ रोजी झाले आहे. सदर करारनाम्यानुसार महामंडळास निश्चित भूईभाडे प्रतिवर्ष रु.२.०० लक्ष व ३% महसूली उत्पन्नावर प्रक्रिया शुल्कच्या (Processing Charges) स्वरुपात मिळत आहेत. तसेच निश्चित भुईभाडयामध्ये प्रत्येक ५ वर्षांनंतर ५% वाढ नमूद केलेली आहे. ॲडलॅब फिल्म प्रा.लि. यांनी मे.रिलायन्स मिडिया वर्क्स असे नाव बदल करण्याबाबत ळ संस्थेस दिलेल्या जागेमध्ये कोणताही बदल झालेला नाही आणि याव्यतिरिक्त मे.रिलायन्स यांना कोणतीही जमीन दिलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## माझगांव (मुंबई) येथील शसनाचा भूखंड अनधिकृत विश्वस्त सदस्यांनी बेकायदा व्यवहार करुन विकासकाला विक्री केल्याबाबत

**(३५) ६०१४० (२१-०४-२०२३). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील माझगांव सी.एस.क्र.१२६ मधील २००२ मध्ये लीज संपलेला ४५८१ चौ.मी. क्षेत्राचा व शासनाच्या ताब्यात असलेला भूखंड अनधिकृत ट्रस्टी संदस्यांनी २०१० मध्ये शासनाची परवानगी न घेता परस्पर मे.गोल्डप्लस कंपनीच्या विकासकाला बेकायदा विक्री केल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ४५८१ क्षेत्रापैकी केवळ १३९९ चौ.मी.इतकाच भूखंड शासकीय असल्याचे संबंधित जिल्हाधिकारी यांनी आर्थिक संगनमत करुन शासकीय दस्तऐवजात बेकायदा नमुद करुन उर्वरीत ३१८२ चौ.मी. क्षेत्राचा भूखंड पेन्शन व टॅक्स भूखंड असल्याचे खोटे दस्ताऐवज बनवून विकासक कंपनीला हस्तांतरीत केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२५-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे,
(२) हे खरे नाही.
कच्छी लोहाना निवासगृह ट्रस्टने भुकर क्र. १२६ या मिळकतीमधील ४५८१ चौ.मी. (१३९९ चौ.मी. भाडेपट्टा क्षेत्र,

३०८२.२३ चौ.मी. पेन्शन ॲन्ड टॅक्स व १०० चौ.मी. फ्री होल्ड लँड) नोंदणीकृत खरेदीखत क्र. बबई-३/५१०४/२०१०, दि.२४.०५.२०१० अन्वये गोल्ड प्लाझा डेव्हलपर्स यांना विनापरवाना हस्तांतरीत केलेले आहे.

(३) जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी शासनास सादर केलेल्या दि.०४.०८.२०१६ च्या अहवालास गोल्ड प्लाझा डेव्हलपर्स यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई येथे रिट याचिका क्र.४६६/२०१६ अन्वये आव्हानीत केले आहे. सदर रिट याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयाने शासनस्तरावर सुनावणी घेऊन निर्णय घेण्याबाबत आदेश दिलेले होते. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शासनाचे महसूल व वन विभागाने सदर प्रकरणी सर्व संबंधीतांना शासन स्तरावरुन सुनावणीची संधी देऊन दिनांक ०१.१२.२०१८ रोजीच्या ज्ञापनाद्वारे माझगांव महसूल विभागातील भुकर क्र.१२३ चा भाग असलेली १३९९ चौ.मी. क्षेत्राची शासकीय भाडेपट्टयाची मिळकत अटी व शर्तींचा भंग केला असल्यामुळे शासनजमा करणेत येत आहे असे आदेश पारीत केले होते. त्यानुसार सदर मिळकतीचा महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियन १९६६ मधील कलम ५३(१) नुसार दिनांक ०८.०३.२०२१ रोजी जबाब पंचनाम्यासह इमारतीस रितसर एकतर्फी ताबा घेणेत येऊन मिळकत पत्रिकेवर महाराष्ट्र शासनाचे नाव दाखल करणेत आले. शासनाचे दिनांक ०१.१२.२०१८ रोजीचे ज्ञापनास Gold Plaza Developers Pvt. Ltd. व कच्छी लोहाना निवास गृह यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई येथे रिट याचिका क्र.१५०/२०१९ व रिट याचिका क्र.१८३९/२०१९ नुसार अव्हानीत केले असुन, सद्यस्थितीत सदर प्रकरण मा. उच्च न्यायालय मुंबई येथे न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात कृषी विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(३६) ६०४२२ (२१-०४-२०२३). श्री.अभिमन्यु पवार (औसा), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कृषी विभागांतर्गत वर्ग १ ते वर्ग ४ ची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असल्याने त्याचा परिणाम कृषी विस्तार योजना राबविण्यावर झाल्याने सदरील रिक्त पदे व भरती प्रक्रिया राबविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कृषी विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (३०-०६-२०२३) :**(१) हे खरे आहे.

कृषि विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींकडून वेळोवेळी मा.मंत्री(कृषि) यांचेकडे मागणी करण्यात आली आहे. सद्यस्थितीत कृषि विभागात गट-अ ते गट-ड संवर्गात २७,५०२ पदे मंजूर असून यापैकी १६,९५७ पदे भरलेली असून १०,५४५ पदे रिक्त आहेत. यापैकी तांत्रिक संवर्गात १७०४५ पदे (महाराष्ट्र कृषि सेवा संवर्ग, कृषि पर्यवेक्षक, कृषि सहाय्यक) मंजूर असून यापैकी १३२१० पदे भरलेली व ३८३५ पदे रिक्त आहेत. कृषि विभागातील शेतकऱ्यांच्या हिताच्या योजना राबविण्यासाठी तांत्रिक संवर्गातील पदांची आवश्यकता असून सदर संवर्गाची बहुतांश पदे भरलेली आहेत. तसेच या संवर्गातील रिक्त पदांचा पदभार नजिकच्या अधिकाऱ्यांकडे सोपवून कृषी विस्तार योजना परिणामकारकरित्या राबविण्यात येत आहेत.

(२) कृषि विभागातील रिक्त पदे भरण्याकरीता (सरळसेवा व पदोन्नती कोटा) मंत्रालयीन प्रशासकीय विभाग स्तरावर तसेच विभागीय कृषि सहसंचालक स्तरावर कार्यवाही कार्यान्वित आहे. त्यानुसार महाराष्ट्र कृषि सेवा गट-अ, संवर्गामध्ये ९२, महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब, संवर्गामध्ये १७४ आणि महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब(कनिष्ठ) संवर्गामध्ये ३१८ अधिकाऱ्यांना पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आली आहे.

महाराष्ट्र कृषि सेवा [गट-अ, गट-ब आणि गट-ब(कनिष्ठ)] संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्याकरीता कृषि सेवा परीक्षा-२०२१ करिता एकूण २०३ आणि कृषि सेवा परीक्षा २०२२ करीता २१४ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र कृषि प्रशासकीय सेवा संवर्गाचे सन २०२१ करीता एकूण २४ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले आहे. या पदांकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून परीक्षेची कार्यवाही कार्यान्वित आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून या पदांकरीता उमेदवारांची शिफारस प्राप्त झाल्यानंतर रिक्त पदे प्राथम्यक्रमाने भरण्यासाठी विचार करण्यात येईल.

मर्यादित विभागीय परीक्षेच्या कोट्यातील कृषि पर्यवेक्षकांची ७५९ पदे कृषि सहाय्यकांमधून भरण्याकरीता दिनांक ०२.०४.२०२३ रोजी परीक्षा पार पडलेली असून सदर परीक्षेच्या अंतिम निकालाच्या आधारे निवड झालेल्या उमेदवारांना कृषि पर्यवेक्षक पदावर पदस्थापना देण्याची कार्यवाही संबंधीत विभागीय कृषि सहसंचालक स्तरावर सुरु आहे. त्याचप्रमाणे वित्त विभाग, शासन निर्णय, दिनांक ३१.१०.२०२२ अन्वये ज्या विभागांचा सुधारीत आकृतिबंध अंतिम झालेला नाही, अशा विभागांना गट-अ, गट-ब व गट-क संवर्गातील (वाहनचालक आणि गट-ड संवर्गातील पदे वगळून) सरळसेवेच्या कोट्यातील ८० टक्के रिक्त पदे भरण्यास मुभा देण्यात आली आहे. त्यानुसार कृषि विभागातील लिपिक-टंकलेखक संवर्गाकरीता एकूण ३७९ पदांची जाहिरात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून दिनांक २०.०१.२०२३ रोजी विज्ञापीत करण्यात आली आहे. तसेच लिपिक वर्गीय संवर्गातील उर्वरीत २१८ पदांकरीता जाहिरात दिनांक ०५.०४.२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. सा.प्र.वि., शासन निर्णय दिनांक ०१.०२.२०२३ अन्वये अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) पदे निश्चित करण्याचे निकष बदलण्यात आलेले आहेत. त्यानुसार कृषि सहाय्यक संवर्गाची सुधारीत बिंदूनामावली प्रमाणित करुन घ्यावयाची कार्यवाही संबंधित विभागीय कृषि सहसंचालक यांचेस्तरावर सुरु आहे. सुधारीत बिंदूनामावली प्रमाणित झाल्यानंतर कृषि सहाय्यक पदभरतीची पुढील नियमोचित कार्यवाही प्राथम्यक्रमाने करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## यावल (जि.जळगांव) तालुक्यातील पूर्व वनक्षेत्रातील तीन आरोपी वनक्षेत्रपालांच्या ताब्यातून पळून गेल्याबाबत

**(३७) ६१०९६ (२१-०४-२०२३). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यावल (जि.जळगांव) तालुक्यातील पूर्व वनक्षेत्रातील अधिकाऱ्यांच्या ताब्यात असलेले तीन आरोपी दिनांक १२ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास वन क्षेत्रपालाच्या ताब्यातून पळून गेले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पळून गेलेल्या आरोपीचा अद्यापपर्यंत शोध लागला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत वनक्षेत्रपालांवर कारवाई होऊ नये म्हणून आर्थिक देवाण-घेवाण झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०७-२०२३) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) संबधित वनपाल व वनरक्षक यांचेवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ (नियम ८) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्ह्यातील पशुवैद्यकीय दवाखान्यात वैद्यकीय अधिकारी उपस्थित नसल्याबाबत

**(३८) ६१२६१ (१९-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील पशुवैद्यकीय दवाखान्यात जनावरांवर लम्पी साथीवरील उपचार करण्यासाठी वैद्यकीय अधिकारी उपस्थित नसल्याचे तसेच औषधांचाही तुटवडा असल्याचे दिनांक २७ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१८-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) कोल्हापूर जिल्ह्यात एकूण २८७९६३ गोवर्गीय पशुधन असून दिनांक २७.०१.२०२३ अखेर १०० टक्के लसीकरण करण्यात आले होते. जिल्हयात दि.०३.०९.२०२२ रोजी लम्पी चर्मरोगाचा प्रादुर्भाव झाल्याचे आढळून आले. एकूण २८७९६३ गोवर्गीय पशुधनापैकी १६५७३ इतके पशुधन लम्पी चर्मरोगाने बाधित झाले होते, त्यापैकी ९२५ इतके पशुधन मृत पावले होते.

जिल्ह्यात ३७ राज्यस्तरीय व २९ स्थानिक स्तरीय पशुवैद्यकीय संस्था कार्यरत असून, ५ सहाय्यक आयुक्त, ६० पशुधन विकास अधिकारी, ८३ सहाय्यक पशुधन विकास अधिकारी, ४८ कंत्राटी पशुधन विकास अधिकारी, मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजनेतील ३ सेवानिवृत्त पशुवैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत.

लम्पी चर्मरोगाच्या नियंत्रणासाठी, तसेच लम्पी चर्मरोग बाधित जनावरांच्या उपचारासाठी जिल्हा नियोजन समितीकडून रु.११०.०० लक्ष तसेच रु. १५०.०० लक्ष इतका निधी राज्यस्तरीय व स्थानिक पशुवैद्यकीय संस्था यांना औषध खरेदीसाठी उपलब्ध करून देण्यात आले होते. त्याव्दारे पुरेशा प्रमाणात औषधसाठा खरेदी करण्यात आला होता. त्यामुळे औषधांचा तुटवडा भासला नाही.

---

## शिरुर येथील दुय्यम निबंधक श्रेणी-१ पद रिक्त असल्याबाबत

**(३९) ६१२९९ (२१-०४-२०२३). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरुर (जि.पुणे) येथील दुय्यम निबंधक श्रेणी-१ हे पद दिनांक १ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारापासून रिक्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिरुर तालुका कृषी व औद्योगिक दृष्टीने व्यापलेला असून शिरुर दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये महिन्याला सुमारे ७०० दस्तांची नोंदणी होत असते, तथापि उक्त पद रिक्त असल्यामुळे परिसरातील लोकांची कामे वेळेवर होत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तालुक्यातील दुय्यम निबंधक श्रेणी -१ हे रिक्् पद भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१९-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

दुय्यम निबंधक श्रेणी-१ शिरुर कार्यालयामधील दुय्यम निबंधक श्रेणी-१ हे पद जरी रिक्त असले तरी देखील सदर कार्यालयामध्ये प्रभारी दुय्यम निबंधक यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. तसेच दुय्यम निबंधक श्रेणी-१ तळेगांव ढमढेरे आणि दुय्यम निबंधक श्रेणी-१, शिरुर या दोन्ही कार्यालयांचे कार्यक्षेत्र हे सामाईक आहे. त्यामुळे उक्त

कार्यक्षेत्रामधील दस्तांची नोंदणी ही तळेगांव-ढमढेरे आणि शिरुर या दोन्ही कार्यालयांमध्ये करता येत असल्याने परिसरातील लोकाची कामे वेळेवर होत आहेत.

(३) दुय्यम निबंधक श्रेणी-१ या पदाकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र सादर करण्यात आलेले असून त्याअनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सन २०२२ व सन २०२३ मध्ये पूर्वपरिक्षा घेण्यात आल्या असून दुय्यम निबंधक श्रेणी-१/मुद्रांक निरीक्षक, गट-ब (अराजपत्रित) संवर्गातील पदभरतीची प्रक्रिया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यातील कुसूंबी गावातील आदिवासींच्या स्मशानभुमीवरील अतिक्रमण हटविण्याबाबत

**(४०) ६१३८४ (२१-०४-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यातील कुसुंबी गावातील आदिवासींच्या ४० गुंठे जमिनीवरील अधिकृत स्मशानभुमीवर माणिकगड सिमेंट कंपनीने सक्षम प्राधिकरणाची परवानगी न घेताच रस्ता तयार करण्याचे काम घेतले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्यासाठी स्मशानभुमीतच मातीचे ढिग टाकण्यात आल्याने आदिवासींमध्ये संतापाची लाट उसळली असून याप्रकरणी तहसिलदार, जिवती व गडचांदूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१८-०७-२०२३) :**

(१), (२), (३) व (४) हे खरे नाही. मौजा कुसुंबी सर्व्हे क्र. १/२ आराजी ०.४० हे. आर. ही जमिन ७/१२ अभिलेखात स्मशानभूमी म्हणून दर्ज आहे. सदर जमिनीवर आदिवासीच्या नावाची नोंद नसल्याचे दिसून येते. दिनांक ०१.०२.२०२३ रोजी मौजा कुसुंबी येथिल ग्रामस्थांनी जिवती तहसिल कार्यालयात दिलेल्या तक्रार अर्जाचे अनुषंगाने तहसिल कार्यालय, जिवती यांनी चौकशी करुन अर्ज निकाली काढलेला आहे.

---

## मुंबई गिरगाव येथिल तीन मिळकतीच्या पी आर कार्ड नोंदीनुसार मालक नसलेल्या व्यक्तींना जिल्हाधिकारी, मुंबई यांनी मालमत्ता नोंदणीकरणाकरिता पाठविलेली नोटीस

**(४१) ६१४६२ (०९-०५-२०२३). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, गिरगांव, उरणकर वाडी, सिद्धी सहकारी गृ. संस्था तसेच माझगांव म्हातार पाखाडी गनपावडर रोड येथील अहमद बिल्डिंग भाडेकरु गृहनिर्माण सहकारी संस्था व आंबेवाडी सहकारी गृहनिर्माण संस्था या तीन्ही संस्थेला मालमत्ता देखभाल व दुरुस्तीसाठी हस्तांतरीत करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी मुंबई शहर यांच्या तर्फे दिनांक ८ डिसेंबर, २०२१ व दिनांक २ मार्च, २०२२, दिनांक १५ फेब्रुवारी, २०२२, दिनांक २२ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास सुनावणीची कार्यवाही सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू तीनही मिळकतीच्या पी.आर.कार्ड नोंदीनुसार मालक नसलेल्या व्यक्तींना जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी मालमत्तेचे थकीत भाडे भरून मालमत्ता नुतनीकरण करण्याबाबत नोटीस बजावण्यात आल्याचे दिनांक १० जानेवारी,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मालमत्ता प्रमाणपत्रावर अधिकृत नांव नसलेल्या व बेकायदेशीररित्या वारसा हक्काचा दावा करणाऱ्या वारसदारांचे सुनावणीमध्ये मालमत्तेच्या हक्कासंबंधीचे कोणतेही सबळ पुरावे दिलेले नसताना आणि मालमत्तेची १५ ते २० वर्षापासून देखभाल व दुरुस्तीकडे दुर्लक्ष करणाऱ्या व्यक्तींना शासन तथा जिल्हाधिकारी यांनी कोणत्या कायद्याच्या व नियमाच्या आधारे मालमत्तेचे अधिकृत मालक नसताना भाडे रक्कम भरून नुतणीकरण करण्याबाबत नोटीस बजावली आहे,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी मिळकतीवरील गृहनिर्माण संस्थेला डावलून जिल्हाधिकारी कार्यालयातील संबंधित अधिकारी मालक नसलेल्या अनाधिकृत व्यक्तीबरोबर संगनमत करुन त्यास बेकायदेशीररित्या मालक ठरविण्याच्या संबंधीत प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२५-०७-२०२३) :** (१), (२), (३) व (४) हे खरे आहे.

सिध्दी सहकारी गृहनिर्माण संस्था, गिरगांव या मिळकतीत उरणकरवाडी रहिवाशी वेल्फेअर असोसिएशन यांनी भुकर क्रमांक ३६९ व १/३६९ क्षेत्र २७८१ चौ.मी. ही मिळकत देखभाल व पुनर्विकास करण्यासाठी अर्जदार सिध्दी सहकारी गृहनिर्माण संस्था (नियो) संस्था, या संस्थेस हस्तांतरीत करण्यास मंजूरी देऊन मिळकतीवरील ८८ भाडेकरु/ रहिवाशी कुटुंबाचे पुनर्विकास करण्याकरीता सहकार्य करणेबाबत केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचेकडील प्राप्त अहवालानुसार शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

माझगांव म्हातार पाखाडी गनपावडर रोड येथील अहमद बिल्डिंग भाडेकरु गृहनिर्माण सहकारी संस्था च्या नुतनीकरणाबाबत संबंधितांना दिनांक ०८.१२.२०२१, दिनांक १५.०२.२०२२, दिनांक ०२.०३.२०२२, दिनांक २२.०४.२०२२, दिनांक २३.०५.२०२२, दिनांक २४.०६.२०२२, दिनांक १५.०७.२०२२, दिनांक ११.०८.२०२२ व दिनांक १५.११.२०२२ रोजी सुनावणी देणेत येऊन प्रस्तुत प्रकरणी भाडेपट्टा नूतनीकरण करणेकामी शासनास प्रस्ताव प्राप्त झाला असून त्याचेवर कार्यवाही सुरु आहे.

माझगांव म्हातार पाखाडी गनपावडर रोड येथील आंबेवाडी सहकारी गृहनिर्माण संस्था या मिळकतींचे भाडेपट्टा नुतनीकरण करणेकामी शासन निर्णय, दिनांक १२.१२.२०१२ मधील तरतुदीनुसार सर्व संबंधितांना नोटीशीद्वारे सुनावणी देण्यात आली आहे.

त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचेकडून दिनांक २०.०२.२०२३ व दिनांक २०.०६.२०२३ अन्वये सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात जिल्हानिहाय कृषी अभियांत्रिकी अधिकारी हे जिल्हा स्तरावर वर्ग-१ दर्जाचे पद निर्माण करण्याबाबत शासनाने आदेश दिल्याबाबत**

**(४२) ६१४९९ (१९-०४-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जिल्हानिहाय कृषी अभियांत्रिकी अधिकारी हे जिल्हा स्तरावर वर्ग-१ दर्जाचे पद निर्माण करण्याबाबत शासनाने कृषी आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना दिनांक ४ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास आदेश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे कृषी अभियांत्रिकी पदवीधारक उमेदवारांमधून विहीत मार्गाने भरण्यात यावेत, अशा सूचना देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात किती जिल्ह्यांमध्ये "कृषी अभियांत्रिकी अधिकारी" हे पद निर्माण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (१७-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) कृषि विभागाचा सुधारीत आकृतीबंध तयार करण्याची कार्यवाही सध्या सुरु आहे. सदर आकृतीबंधामध्ये कृषि अभियांत्रिकी अधिकारी या पदाची आवश्यकता पडताळून पाहण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे उदगीर (जि.लातूर )येथील सर्वे नं.२१७/१ मधील १ हेक्टर ८२ आर क्षेत्रास रहिवाशी प्रयोजनार्थ अकृषी परवानगी देतांना चुकीच्या पध्दतीने दिल्याबाबत**

**(४३) ६१८५६ (२१-०४-२०२३). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे उदगीर (जि.लातूर) येथील सर्वे नं.२१७/१ मधील १ हेक्टर ८२ आर क्षेत्रास रहिवाशी प्रयोजनार्थ अकृषी परवानगी देताना तहसिलदार, उदगीर यांनी नियमांचे उल्लंघन करुन बेकायदेशीर व चुकीच्या पध्दतीने परवानगी दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करुन दोषी असलेल्यांवर कारवाई करण्यात यावी तसेच सदर जागेचा एन.ए. (अकृषी परवानगी) रद्द करण्याबाबतची मागणी जिल्हाधिकारी, लातूर, विभागीय आयुक्त, औरंगाबाद, महसूलमंत्री, मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान स्थानिक नागरीकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने नियमाबाह्य पध्दतीने पदाचा गैरवापर करुन अकृषी परवानगी देणाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) तहसिलदार, उदगीर यांनी मौजे उदगीर, ता. उदगीर, जि. लातूर येथील सर्वे नं २१७/१ मधील १ हे. ८२ आर जमिनीचा अकृषिक परवाना दिनांक २३.३.२०२२ रोजीच्या आदेशान्वये दिला होता. त्याविरुद्ध श्री. आकाश सोनटक्के व इतर यांनी उपविभागीय अधिकारी, उदगीर यांचे न्यायालयात अपील दाखल केले. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम २४७ अन्वये उपविभागीय अधिकारी, उदगीर यांनी सुनावणी घेवून तहसिलदारांचा अकृषिक परवाना तांत्रिक बाबींमुळे रद्द केला आणि तहसिलदार, उदगीर यांनी सर्व त्रुटींची पूर्तता करुन सुधारित अकृषिक आदेशाबाबत चार महिन्यांच्या आत निर्णय घ्यावा असे आदेश दिनांक २७.३.२०२३ रोजी पारित केले.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गोरेगांव (पूर्व ) आरे कॉलनी येथे पर्यटन स्थळे विकासाच्या प्रतिक्षेत असल्याबाबत**

**(४४) ६२३०४ (१९-०४-२०२३). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोरेगांव (पूर्व ) आरे कॉलनी येथे छोटा काश्मिर, आरे उद्यान, पिकनिक पॉईट आदि पर्यटन स्थळे विकासाच्या प्रतिक्षेत असल्याचे माहे, जानेवारी,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पर्यटन स्थळांचे सक्षमीकरण व सोयी-सुविधा पुरविल्यास पर्यटकांच्या संख्येमध्ये वाढ होऊन शासनाच्या महसूलात वाढ होणार असल्याने यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधीनी शासनाकडे निधी मिळण्याबाबत पाठपुरावा केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पर्यटन स्थळांच्या सौदर्यीकरणात वाढ करण्याच्या दृष्टीने शासनाने निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१४-०७-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) जिल्हा नियोजन व विकास समिती, मुंबई उपनगर जिल्हा यांच्याकडून आरे दुग्ध वसाहतीमधील पर्यटन स्थळांच्या सौदर्यीकरणात वाढ करण्यासाठी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग, आरे यांच्या कार्यालयास रु.४९५.४३ लक्ष रकमेस प्रशासकीय मंजूरी प्राप्त असून त्यापैकी रु. १५० लक्ष निधी उपलब्ध झालेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील सहकारी गृहनिर्माण संस्थासाठी स्वतंत्र विभाग स्थापन करण्याबाबत

**(४५) ६२४६४ (२०-०४-२०२३). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शासनाच्या सहकार कायद्याखाली सहकारी गृहनिर्माण संस्था (सोसायटी) नोंदणीकृत असल्यामुळे सहकार विभागांतर्गत येत असल्यामुळे सोसायटीतील तक्रारींची दखल सहकार विभागाला घेणे क्रमप्राप्त होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तक्रारींची दखल घेण्यात सहकार विभागाचा जास्त वेळ जात असून विभागाची इतर कामे प्रलंबित राहत असल्यामुळे त्यासाठी स्वतंत्र विभाग स्थापन करुन वेगळी यंत्रणा निर्माण करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने निर्णय घेऊन स्वतंत्र आयुक्त, स्वतंत्र उपनिबंधक व निबंधक कार्यालये सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०३-०७-२०२३) :** (१) होय.
(२) स्वतंत्र विभाग स्थापन करण्याची आवश्यकता नाही. सहकार आयुक्त कार्यालयाने दिनांक २६.०५.२०२२ रोजीच्या पत्रान्वये "सहकारी गृहनिर्माण संस्था-सुव्यवस्थापन व तंटा मुक्त संस्था अभियान" राबविण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. यात जिल्हा हाऊसिंग फेडरेशनचाही सहभाग असल्यामूळे तक्रारींची संख्या कमी होण्यास मदत होऊ शकेल.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## देवगिरी (ता.फुलंब्री, जि.औरंगाबाद) येथील सहकारी साखर कारखाना कर्मचाऱ्यांच्या पगाराबाबत

**(४६) ६२८८४ (२०-०४-२०२३). श्री.हरिभाऊ बागडे (फुलंब्री) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवगिरी (ता.फुलंब्री, जि.औरंगाबाद) येथील सहकारी साखर कारखान्यातील कर्मचाऱ्यांनी पगारासंदर्भातील मागणीचे निवेदन दिनांक ३० जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास प्रशासक व जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात किती दिवसापासून कामगारांना पगार मिळाला नाही, त्यामुळे जमीन विकून पगार काढा अशी मागणी त्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०५-०७-२०२३) :**(१) होय.
(२) व (३) कर्मचाऱ्यांचे पगार देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चोपडा, यावल व रावेर (जि.जळगांव) या तीन तालुक्यांमध्ये सातपुडा क्षेत्राची जबाबदारी वन विभागाच्या कर्मचाऱ्यांवर असल्याबाबत

**(४७) ६२९९१ (२१-०४-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चोपडा, यावल व रावेर (जि.जळगांव) या तीन तालुक्यांमध्ये सातपुड्याचे सुमारे ८७ हजार हेक्टर क्षेत्र वन विभागाकडे येत असून या क्षेत्राची जबाबदारी वन विभागाच्या केवळ ९० कर्मचा-यांवर असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त वन विभागातील रिक्त पदांमुळे वन विभागाच्या कर्मचाऱ्यांकडून तस्करी रोखण्याचे प्रयत्न केले जात असतानाही आळा घालणे कठीण होत असून यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही. चोपडा, यावल व रावेर (जि. जळगांव) या तीनही तालुक्यामध्ये माहे जानेवारी, २०२३ मध्ये एकूण २१५ अधिकारी व कर्मचारी कार्यरत होते.
(२) वन विभागाच्या कर्मचाऱ्यांकडून तस्करी रोखण्यासाठी वनकर्मचारी/अधिकारी एकत्रितरित्या नियमित गस्त घालीत असतात. तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी, संरक्षण व अतिक्रमण निर्मूलन स्वतंत्र पथकामार्फत नियमित गस्त करण्यात येऊन तस्करी रोखण्यात आळा घालण्यात आलेला आहे. वनातील विविध गुन्ह्यांची माहिती वनविभागास देण्याकरिता १९२६ हा हेल्पलाईन क्रमांकाची सुविधा उपलब्ध आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात वाळू माफियांकडून पर्यावरणाच्या नियमांचे उल्लंघनहोत असल्याबाबत

**(४८) ६३२२० (०९-०५-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात वाळू माफियांकडून पर्यावरणाच्या नियमाचे उल्लंघन करुन मोठ्या प्रमाणात नद्यांमधील गौन खनिज तसेच वाळू तस्करी करण्यात येत असून रेती माफियांकडून अधिकाऱ्यांवर सातत्याने होणारे हल्ले विचारात घेता, वाळू तस्करीवर प्रतिबंध बसावा यासाठी दिनांक १५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास वाळू धोरण आणण्याचे नियोजन असल्याची माहिती महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास दिली, हे खरे आहे काय,
(२) तसेच राज्यातील नद्यांमधील होणारा वाळू उपशाबाबत गठीत करण्यात आलेल्या राधाकृष्ण गमे यांच्या अध्यक्षेखालील समितीने तीन महिन्यांपूर्वी अहवाल तयार करुन शासनाला सादर केला असून, उक्त नदृयामधील वाळूचे कायमचे लिलाव बंद करणार असल्याची घोषणा महसूलमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ९ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,उक्त वाळू धोरणाचे थोडक्यात संक्षिप्त स्वरुप काय आहे, त्यानुसार तस्करी करणाऱ्या वाळू माफियांविरुद्ध कठोर कारवाई करुन शासनाचे होत असलेले महसूली नुकसान वाचविण्यासाठी शासनाने वाळू धोरणात कोणत्या उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (११-०७-२०२३) :** (१), (२), (३) व (४) राज्यातील नागरिकांना स्वस्त दराने वाळू/रेती उपलब्ध करुन देणे तसेच, अनधिकृत उत्खननास आळा घालण्याच्या उद्देशाने शासनामार्फत रेती उत्खनन, साठवणूक, व्यवस्थापन व ऑनलाईन प्रणालीद्वारे विक्री करण्याबाबतचे सर्वकष धोरण शासन निर्णय क्रमांक गौखनि-१०/१२२२/प्र.क्र.८२/ख-१ दिनांक १९ एप्रिल,२०२३ अन्वये निर्गमित केला आहे.

---

**चामोर्शी (जि.गडचिरोली) तालुक्यातील सोनापूर साजा क्रमांक १८ चे तलाठी शेतकऱ्यांना त्रास देत असल्याबाबत**

**(४९) ६३५०२ (२१-०४-२०२३). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चामोर्शी (जि.गडचिरोली) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेत जमीनी शासनस्तरावरूनच जमीन वर्ग १ करण्यासाठी शासन निर्णय घेण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जमीन वर्ग १ करण्याची जबाबदारी संबंधित महसूल अधिकारी व कर्मचारी यांची आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सोनापूर जिल्हा गडचिरोलीच्या तलाठ्याने या भागातील शेतकऱ्यांच्या जमिनी वर्ग १ करण्याची प्रक्रिया न राबविता त्यांना एकरी १.५ लाख रुपये भरून जमीन वर्ग १ करण्यास सांगितले असून पैसे न भरल्यास या शेतकऱ्यांच्या जमिनी शासन दरबारी जमा करण्यात येतील अशी धमकी दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आपल्या कर्तव्यात कसूर करून शेतकऱ्यांना त्रास देणाऱ्या तलाठ्याला व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (११-०७-२०२३) :** (१), (२), (३), (४) व (५) महाराष्ट्र शासन अधिसुचना दिनांक २१ एप्रिल, २०१८ व महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग शासन परीपत्रक क्र. जमीन-२०१८/प्र.क्र.३५/ज-१ दिनांक ०७ जुन, २०१८ अन्वये, विदर्भातील भूमिधारी आणि हस्तांतरणावर निर्बंध असलेल्या भूमिस्वामी धारणाधिकाराच्या जमिनी भोगवटदार वर्ग-१ मध्ये परावर्तीत करण्याच्या अनुषंगाने क्षेत्रिय महसूली प्राधिकारी यांना दिशानिर्देश देण्यात आले होते. त्यानुसार जमीन भोगवटादार वर्ग- १ मध्ये करण्याची जबाबदारी संबंधित महसुल अधिकारी व कर्मचारी यांची आहे.

उपरोक्त शासन अधिसूचना दिनांक २१ एप्रिल, २०१८ व शासन परीपत्रक दिनांक ०७ जुन, २०१८ मधील तरतुदीनुसार तलाठी सोनापुर ता. चामोर्शी जि. गडचिरोली यांचे अधिनस्त एकुण ०६ गावातील एकुण पात्र २२६ शेतकऱ्यांचे एकुण स.नं. २२६ क्षेत्र १५१.५९ हे. आर भोगवटादार वर्ग-२ जमीन भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करण्याबाबत शासन निर्णयानुसार कार्यवाही केल्याचे दिसुन येते.

तसेच सदरचे भोगवटादार वर्ग-२ चे जमीनी भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करण्याकरीता तलाठी सोनापुर यांनी शेतक-याला पैश्याची मागणी केल्याबाबत किंवा जमीनी सरकार जमा करण्यात येईल अशी धमकी दिल्याबाबत तहसिल कार्यालय, चामोर्शी तसेच जिल्हाधिकारी कार्यालय गडचिरोली येथे कोणतेही तक्रार प्राप्त झाली नाही.
त्यामुळे, तलाठी व संबंधित अधिकारी यांचेवर कारवाई करण्यात आली नाही.

---

**मौजे धामटण (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील वन विभागाच्या अखत्यारितील जागेवर नाशिकच्या धर्तीवर बोटॅनिकल गार्डन बनविण्याबाबत**

**(५०) ६३५१२ (२१-०४-२०२३). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे धामटण (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील वन विभागाच्या अखत्यारितील जागेवर नाशिकच्या धर्तीवर बोटॅनिकल गार्डन बनविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावित बोटॅनिकल गार्डन संदर्भात प्राथमिक सर्वेक्षण देखील झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात बोटॅनिकल गार्डनच्या प्रस्तावाला गती देऊन गार्डन बनविण्याच्या कामाला सुरुवात करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०७-२०२३) :** (१) स्थानीक लोकप्रतिनिधी यांनी त्यांचे दिनांक १९.०४.२०२१ रोजीच्या पत्रान्वये मौजे धामटण (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील वन विभागाच्या अखत्यारितील वनक्षेत्रामध्ये नाशिकच्या धर्तीवर बोटॅनिकल गार्डन बनविण्याकरीता प्राथमिक सर्वेक्षण करणेकरीता परवानगी मागितली होती.

(२) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रस्तावित बॉटनिकल गार्डन संदर्भात क्षेत्रिय कर्मचाऱ्यांबरोबर प्राथमिक सर्वेक्षण केले आहे.

(३) बॉटनिकल गार्डनच्या प्रस्तावाला गती देऊन गार्डन बनविण्याच्या कामाला सुरुवात करण्याच्या दृष्टीने लोकप्रतिनिधींनी मागणी केलेल्या जागेचे क्षेत्रिय कर्मचाऱ्यांबरोबर प्राथमिक सर्वेक्षण करण्यात आले आहे. मौजे धामटण (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील वनविभागाच्या अखत्यारितील संरक्षित वन सर्वे क्र.१२५ व संरक्षित वन सर्वे क्रमांक १२७ मध्ये मिळून एकूण १.९३५ हे. क्षेत्र लागवडी योग्य असल्याचे लोकप्रतिनिधी यांना कळविण्यात आले आहे. याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.